॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/२६४ दिनांक २२/११/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ हा दिवस "संविधान दिवस" म्हणून साजरा करणे बाबत.

संदर्भ: मा. अ.शा. मुत्याल उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे जा.क्र.संकीर्ण ११२४/प्र.क्र. ७२/समन्वय दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ रोजीचे परिपत्रक.

महोदय,

उपरोक्त विषयी मा. अ.शा. मुत्याल उपसचिव, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भिय परिपत्रकान्वये दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करून दिनांक २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४–२५ या अमृत महोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४–२५ साजरा करण्याबाबतचा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १० ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

भारताच्या संविधानाचे तत्वज्ञान, मुल्य, आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्ताविक/उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विद्यार्थी व नागरिकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यात यावे असे कळविले आहे.

१) संलग्नित महाविद्यालये, शैक्षणिक संस्थामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यात यावे.

२) शासकीय ग्रंथालयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ग्रंथपाल व सार्वजनिक ग्रंथालयामध्ये अध्यक्ष/सचिव यांच्या उपस्थितीत वाचक/सभासदांसह भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वरील वेळेत वाचन करावे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी "संविधान दिवस" आपल्या महाविद्यालयात जास्तीत जास्त संख्येने रा.से.यो. स्वयंसेवक, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी, व सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सहभागी करून घेवून सकाळी ११:०० वाजता भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून साजरा करण्यात यावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण ११२४/प्र.क्र.७२/समन्वय**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २२ नोव्हेंबर, २०२४

वाचा :- सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. वीसीएच-२० प्र.क्र.२४२५९२/ शिक्षण, दिनांक १० ऑक्टोंबर, २०२४

परिपत्रक

दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करुन दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ साजरा करण्याबाबतचा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

भारताच्या संविधानाचे तत्वज्ञान, मूल्य, आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्ताविक/उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विद्यार्थी व नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यात यावे.

१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, तत्सम शैक्षणिक संस्थामध्ये, सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत दिनांक २६ नाव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याबाबत आयोजन करण्यात यावे.

या उपक्रमाबाबत सर्व विद्यापीठांनी संलग्नित महाविद्यालयांना आवश्यक सूचना द्याव्यात.

२) शासकीय ग्रंथालयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ग्रंथपाल व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अध्यक्ष/सचिव यांच्या उपस्थितीत वाचक/सभासदांसह भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वरील वेळेत वाचन करावे.

३) सदर उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल याबाबत सर्व विद्यापीठे, संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/ कला / ग्रंथालय यांनी आवश्यक दक्षता घ्यावी.

संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या अन्य उपक्रमांबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(अ. शा. मुत्याल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
७. संचालक, कला संचालनालय, मुंबई
८. संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई
९. कुलसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये (उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यापीठांचे कुलसचिव यांच्यामार्फत)
११. सर्व सह सचिव/ उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती